# वाशिम यशोगाथा

## ‘प्रधानमंत्री मुद्रा योजना’ मुळे बेरोजगारीवर मात

नाव : दिलीप दत्ता नवघरे

मोबाईल न. : ९६३७०१५३१६.

गाव : येवता, ता.रिसोड जिल्हा- वाशिम, ह.मु. शंकरबाबा रोड, लाखाला वाशिम

व्यवसाय : मालवाहक ऑटो व्यवसाय

रिसोड तालुक्यातील मालेगाव रिसोड मार्गावर असलेल्या येवता येथील रहिवाशी दिलीप नवघरे. हलाखीची परिस्थिती आणि घरातील अठराविश्व दारिद्र्य इच्छाशक्ती असून हि यश मिळेना. गावातून स्थानांतरीत होऊण काही वर्षापूर्वी वाशिम येथे रोजगार मिळवण्याचा निर्णय घेऊन दिलीप यांनी वाशिम शहर गाठले. मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करण्याचा त्यांचा नित्यनियम सुरु झाला. परंतु दिवसेंदिवस होत असलेली महागाई परंतु उत्पन्नाचा अपुरा स्त्रोत यामुळे आर्थिक अडचणीला नेहमी सामोरे जावे लागत असे. परंतु अंधार्या काळोखानंतर उगवणारी पाहत म्हणजे ‘मुद्रा’ योजना. मित्रमंडळी कडून दिलीप यांना मुद्रा योजनेची माहिती मिळाली. परंतु आज पर्यंत कधी बँक काय आहे आणि तेथील व्यवहारापासून अनभिज्ञ असलेले दिलीप यांनी आयडीबीआय बँक वाशिम शाखा गाठली. तेथे बँक व्यवस्थापकांना भेटून आपल्या परिस्थितीबद्दल अवगत केले. बँक व्यवस्थापकांनी सुद्धा त्यांना उत्पन्नाची विविध स्त्रोतांबद्दल माहिती दिली. बँक व्यवस्थापकांनी सुचविलेल्या विविध प्रकारामध्ये त्यांना ऑटो चालकाचा व्यवसाय करण्याची इच्छा प्रगत केली. दिलीप यांनी बँक व्यवस्थापकांना स्वतः जमा केलेली बचत आणि अवश्यकत असलेले कर्ज पुरवठा याबद्दल माहिती दिली असता बँक व्यवस्थापक साहेबांनी विनाविलंब ५० हजार रुपयाचे कर्ज मंजूर केले. आज दिलीप यांनी स्वतः ची गुंतवणूक आणि बँक द्वारा मुद्रा अंतर्गत मिळालेले अर्थ सहाय्यामुळे स्वतः चा जुना ऑटो मालवाहक ऑटो घेऊन त्याद्वारे पाणी वितरणाचा व्यवसाय सुरु केला. मिळेल ती मजुरी सोबतच दिलीप यांनी पाणी वितरण व्यवसाय सुरु करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अतिशय चांगल्या परिस्थिती मध्ये सुरु आहे. महिन्याला सरासरी १५ ते २० हजार रुपये या व्यवसायातून दिलीप यांना उत्पन्न होते आणि कर्जाची परत फेड सुद्धा सुरळीत सुरु आहे.

